MARUTRAOJI GHULE PATIL COLLEGE AHMEDNAGAR

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,
मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र
महाविद्यालय अहमदनगर

२०२१-२०२२

विद्यार्थ्यांचे नाव :- भिंगारदिवे मोनाली बाळासाहेब.
वर्ग :- T.Y.B.A (तितीय वर्ष कला)
विषयाचे नाव :- वर्णनात्मक भाषाविज्ञान भाग-2
विषयाचा कोड नं :- DSE-2D 36022
संशोधन प्रकल्पाचे नाव :- इंडो-युरोपियन भाषासंकुल
मार्गदर्शक :- प्रा. आर. ए. नेटके.

Page No. :
Date :

# अनुक्रमणिका

| अ. क्र. | मुद्द्याचे नाव | पृष्ठ क्र. | सही |
|---|---|---|---|
| १) | विषयाची प्रस्तावना | | |
| २) | प्रकल्पाची उद्दिष्टे | | |
| ३) | इंडो-युरोपियन भाषाकुलाची गरज | | |
| ४) | इंडो-युरोपियन भाषाकुलाची व्याप्ती | | |
| ५) | इंडो-युरोपियन भाषाकुलाची माहितीचे विश्लेषण | | |
| ६) | संशोधन प्रकल्पाच्या कार्याचे समायोजन | | |
| ७) | संदर्भग्रंथ सूची | | |

Teacher's Signature

# प्रस्तावना

इंडो - युरोपीय हे जगातील एक प्रमुख भाषाकुळ आहे. युरोप दक्षिण आशिया, इराण, अनातोलिया इत्यादी भूभागांमध्ये वापरल्या जाणाऱ्या बहुंशी प्रमुख भाषा आणि बोली त्याच कुळातील आहेत संख्या या कुळातील ४४५ भाषा अस्तित्वात आहेत.

सध्या जगात ३ अब्ज इंडो-युरोपीय भाषिक लोक आहेत. सध्या जगातील सुमारे ४६% लोकांची इंडो- युरोपीयन भाषाकुळातील भाषा ही मातृभाषा किंवा पहिली भाषा आहे. युरोप मधील बहुतांश महत्वाच्या भाषा याच भाषा कुळातील आहेत. युरोपमधील बहुतांश महत्वाच्या भाषा याच भाषाकुळातील आहेत. या भाषांचे लेखी पुरावे अनातोलीयन भाषा. मायसेनियन ग्रीक भाषा यामध्ये कांस्य युगापासून मिळू लागले, या कुळातील सर्व भाषा त्या आधीच्या काळातील एका भाषेपासुन उत्पन्न झाल्या असल्या पाहिजेत ज्या बहुधा नवपाषाण युगात बोलली जात असावी. या भाषेचे पुनर्निर्माण प्रोटो- इंडो -युरोपीय भाषा म्हणून करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अर्थातच याचे कोणतेही लिखित प्रमाण आज उपलब्ध नाही. पण सांस्कृतिक आणि धार्मिक पैलुंवर आधारित प्रोटो- इंडो- युरोपीय काळातील मानव कोणते शब्द वापरत होता त्याचा अंदाज घेतला जात आहे.

तसेच त्याच्याशी संबंधित इतर संस्कृतींमध्ये, जिथून प्रोटो-इंडो-युरोपीय मानव स्थलांतरित झाला, त्या भूभागावर प्राचीन आणि आधुनिक इंडो-युरोपीय भाषक यांच्याशी संबंधित भाषेच्या या संकल्पातून सांगितला आहे.

# उद्दिष्टे

१) इंडो-युरोपिअन भाषाकुलातील या गटाच्या भाषांतील बऱ्याचशा शब्दांची व्युत्पत्ती एखाद्या क्रियाधातूपाशी जाऊन पोहोचते, या धातूपाशी येऊन पोहोचल्यानंतर अर्थदृष्ट्या आणिक पृथःकरण करणे शक्य नसते. आणिक पृथःकरण करायचे असल्याचे ते केवळ ध्वनि दृष्ट्या करावे लागते.

② इंडो-युरोपिअन भाषाकुलातील भाषांत नामे व क्रियापदे सर्व साधारणः भिन्न असतात, नामांचे व क्रियापदांचे प्रत्यय वेगळे असतात त्यांची घटना वेगळी असते.

③ शब्दांचे प्रत्यय गाळून त्यांचा एक सामासिक शब्द बनविण्याची प्रवृत्ती इंडो-युरोपिअयन भाषा-कुलातील भाषामध्ये दिसून येते.

④ इंडो-इराणिअन मराठी भाषा भारतीय उपांगी शाखेच्या आर्य भारतीय गटातील आहे.

⑤ इंडो-युरोपिअन भाषाकुलातील सर्व शब्दांचा भाषावैज्ञानिक अभ्यास झालेला आहे.

इंडो - युरोपियन भाषासंकुलणाची गरज

भाषेचा वैज्ञानिक अभ्यास वेगवेगळ्या पद्धतींनी करता येतो. एखाद्या भाषेतील एका विशिष्ट कालखंडाचा अभ्यास करून त्या कालखंडातील ध्वनव्यवस्था, पदव्यवस्था, वाक्यव्यवस्था इत्यादी स्तरांच्या परस्परसंबंधाचे वर्णन करणे ही भाषाभ्यासाची एक पद्धती होय. अशीच तुलना करीत अधाखी मागे गेले असता संस्कृत, ग्रीक आणि लॅटिन या साधारणत समकालीन असलेल्या भाषांत ध्वनीअर्थ-दृष्ट्या सारखे असलेले बरेच शब्द आढळतात. हिटाइट अवेस्ता, प्राचीन पार्शियन, लिथुएनिअन या भाषांशीही संस्कृतचे साधर्म्य आहे. शब्दसंग्रह आणि व्याकरणिक संरचना या दोन्ही स्तरावर वरील भाषामध्ये साम्य आढळते, त्यामुळे या भाषा एका भाषेपासून निर्माण झाल्या आहेत, म्हणजेच एका भाषाकुलातील आहेत असे आपण म्हणू शकतो. वरील सर्व भाषा इंडो-युरोपिअन भाषेपासून उद्भवलेल्या आहेत, असे मानले जाते. असल्यामुळे या भाषाकुलाला इंडो - युरोपिअन भाषाकुल असे म्हटले जाते.

इंडो - युरोपिअन भाषा अस्तित्वात नाही. (Proto-Indo - European) तिचे पुनर्रचन करावे लागते.

उदाहरण - संस्कृत, ग्रीक आणि लॅटिन या भाषांतील साधर्म्य असलेले काही शब्द व त्यांची पुनर्रचित रूपे.

| इंडो-युरोपिअन | संस्कृत | ग्रीक | लॅटिन | |
|---|---|---|---|---|
| ped | pad | pod | ped | (पाय) |
| gen | janu | gonu | genu | (गुडघा) |

इंडो-युरोपिअन

एक भाषेद्भवस्था च्या
Sept m, pater. आधारे भाषेचे वर्गीकरण केले जाते. इंडो-युरोपिअन भाषाकुल - युरोपातील व उत्तर भारतातील भाषांच्या समावेश मुख्यत्वे इंडो-युरोपियन भाषाकुलात होतो.
इंडो-युरोपिअन भाषाकुल मराठी, गुजराती, बंगाली हिंदी इत्यादी आहे. इंडो-युरोपिअन भाषा-कुलातील भाषांमध्ये असणारी साम्यस्थळे लक्षात घेतल्यानंतर इंडो-युरोपिअन भाषा बोलणारे लोक प्रारंभी एकत्र राहात असावेत आणि त्यांच्या टोळ्या परस्परांपासून दूर गेल्यानंतर मूळ भाषेत फरक होत गेला असावा, असा अंदाज मात्र एकमताने मांडला येतो. इंडो-युरोपिअन भाषा इ. स पूर्व सुमारे 3000 वर्षे बोलली जात असावी व इ. स पूर्व 2000च्या आसपास तिच्या शाखा होण्यास प्रारंभ झाला असावा. इंडो-युरोपिअनच्या स्वन व्यवस्थेची आणि व्याकरण व्यवस्थेची ठळक येते. इंडो-युरोपिअन भाषासंकुलनाची गरज आहे.

इंडो-युरोपिअन भाषाकुल व्याप्ती :-

इंडो-युरोपिअनपासून निर्माण झालेल्या बहुतेक प्राचीन भाषांत अपश्रुती आढळते. इंडो-युरोपिअन भाषेत नाम आणि क्रिया यांचे विकार वेगळे आहेत. कालविचार फारसा विकसित झालेला नसला, तरी क्रियांचा वापर तीन पुरुष व तीन वचने यानुसार केलेला दिसतो. नामांचे व सर्वनामांचे विभक्ती-प्रत्यय काही प्रमाणात वेगळे असावेत. नामे तीन लिंगात वापरली जात असून लिंग व्याकरणिक स्वरूपाचेही असावे सामासिक शब्द तयार करण्याची प्रवृत्ती होती. इंडो-युरोपिअन भाषेत [अ] [ए] व [ओ] हे तीन स्वर आहेत त्यांचे उच्चार ऱ्हस्व व दीर्घ अशा दोन्ही पद्धतींनी केले जातात [अ] चा एक अतिऱ्हस्व उच्चारही केला जातो. (हा उच्चार [ə] असा दर्शविला जातो) [इ] [उ] [म] [न] [र] आणि [ल] यांचे उच्चार आक्षरिक आहेत. हे स्वन कधी स्वराप्रमाणे तर कधी व्यंजनाप्रमाणे वापरले जातात. स्वराचा उच्चार सानुनासिक होत असावा [क] चे तीन उच्चार असावेत ① कंठ्योष्ठ्य स्पर्श [क्व] (२) तालव्य स्पर्श [क] [३] अलिजिव्हीय किंवा [द], [ध] (काही अभ्यासक यांना वत्स्य मानतात. द्वयोष्ठ्य स्पर्श [त] [द] [ध] अघोष घर्षक [स] आणि सघोष स्वनांबरोबर येणारा संघोष स्पर्श [ज] हे स्वन इंडोयुरोपिअन भाषेत आढळतात.
युरोपिअन भाषाकुलातील स्थान निश्चित करण्यासाठी इंडो-इरानिअन शाखेचा विस्ताराने परिचय करून घ्यायला हवा इंडो-इरानिअन शाखेला आर्यन शाखा असेही म्हटले जाते.

इंडो-इराणिअन शाखेचे आर्यभारतीय भाषा आणि
असे दोन विभाग होतात. प्राचीन आर्यभारतीय
भाषा (वैदिक संस्कृत) आणि प्राचीन इराणी भाषा
या भाषांतील साम्य लक्षात घेता या दोन
भाषा बोलणारे लोक इराणमध्ये पूर्वी एकत्र
राहिले असावेत आणि एकच भाषा बोलत
असावेत. या मताच्या ज्या मूळ भाषेपासून
निर्माण झाल्या ती इंडोइराणिअन या जोड-
नावाने ओळखली जाणारी भाषा मात्र
अस्तित्वात नाही. इंडो-युरोपिअन भाषेप्रमाणे
इंडो-इराणिअन भाषेचे पुनर्रचन केले.

# इंडो-युरोपिअन भाषासंकुल

माहितीचे विश्लेषण :-

इंडो-युरोपिअन भाषाकुलाचा अभ्यास भाषाविज्ञानात अनेक कारणांनी महत्त्वाचा ठरतो. भाषाभ्यासात इंडो-युरोपिअन भाषाकुलाचीच कल्पना सर्वप्रथम मांडली गेली. या कुलातील भाषांचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप निश्चित झाले आणि त्याच पद्धती वापरून जगातील अन्य भाषांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला.


इंडो-युरोपिअन भाषाकुलातील सर्व शाखांचा भाषावैज्ञानिक अभ्यास झालेला आहे. बऱ्याचशा शाखांमधील भाषांचे प्राचीन आधिक नमुने उपलब्ध आहेत. या कुलातील भाषांचे कुलहृदय परस्परांशी असलेले संबंध निश्चित झालेले आहेत. एन (Ainu) किंवा अनामी (व्हिएतनामी) भाषांच्या संदर्भात निर्माण होणारी वर्गीकरणविषयक विवादता इंडो-युरोपिअन भाषांच्या संदर्भात निर्माण होत नाही.

इंडो-युरोपिअन भाषाकुलाला इंडो-जरमॅनिक अथवा आर्य भाषाकुल असेही म्हटले जाते. पूर्वेकडील भारतापासून पश्चिमेकडील आईसलँड या देशापर्यंत साधारण: इंडो-युरोपिअन भाषाकुलाचा विस्तार आहे. आईसलँडमधील भाषा जरमॅनिक शाखेतील आहे. इंडो-जरमॅनिक या नावातून भारत ते आईसलँड असा या भाषाकुलाचा भौगोलिक विस्तार काही प्रमाणात स्पष्ट होतो. जर्मन भाषावैज्ञानिक आर्य भाषाकुल हे नाव वापरीत इंडो-जरमॅनिक या नावाचा आग्रह धरतात.

एकोणिसाव्या शतकात मॅक्समुलर आदी काही भाषा-वैज्ञानिक इंडो-युरोपियन भाषाकुलासाठी आर्य भाषाकुल हे नाव वापरित असत. पुढे इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या भारतीय इराणी शाखेतील भारतीय भाषांना आर्यभारतीय (इंडो-आर्यन) भाषा असे म्हटले जाऊ लागले.
साहजिकच आर्य भाषाकुल हे नाव रूढ होऊ शकले नाही. आज या भाषाकुलासाठी इंडो-युरोपियन हेच नाव बहुधा वापरले जाते.
इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या केवळ आठ शाखा आहेत, असे आरंभी मानले जात असे. तुखारी आणि हिटाइट भाषांच्या शोधामुळे इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या दहा शाखा होतात. काही भाषावैज्ञानिक इलिरियन (Illyrian) भाषेला इंडो-युरोपियन भाषाकुलाची स्वतंत्र शाखा मानतात. इलिरियन भाषेला आरंभी आल्बेनियनची पूर्वस्थिती मानले जात असे बाल्टिक व स्लाव्हिक भाषांचा एकत्रित विचार न करता इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या दोन स्वतंत्र शाखा म्हणूनही त्यांचा विचार केला जातो. सातम् वर्ग आणि केन्तुम वर्ग- इंडो युरोपियन भाषेतील तालव्य स्पर्श ध्वनी इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या काही शाखांत घर्षक उच्चारला जातो. तर इंडो-युरोपियन भाषेतील kmtom हा शब्द उच्चारला जातो.

## संशोधन कार्याचे समायोजन

इंडो-युरोपिअन भाषाकुलाच्या ह्या वंश-वृक्षावरून मराठी भाषेचे इंडो-युरोपिअन भाषाकुलातील स्थान स्पष्ट होईल. इंडो-इराणिअन शाखेच्या काही ठळक भाषा नोंदविलेल्या आहेत.




भारतात प्रामुख्याने चार भाषाकुलांतील भाषा बोलल्या जातात. इंडो युरोपिअन भाषाकुल मराठी गुजराती, बंगाली, हिंदी इत्यादि.

इंडो-युरोपिअन भाषाकुल युरोपातील व उत्तर भारतातील भाषांचा समावेश मुख्यत्वे इंडो-युरोपियन भाषाकुलात होतो. इंडो-युरोपिअन भाषा (proto-Indo-Europeon) अस्तित्वात नाही.

संस्कृत ग्रीक आणि लॅटिन या भाषांतील साधर्म्य असलेले काही शब्द व त्यांची पुनर्रचित. वरील सर्व भाषा इंडो-युरोपियन भाषेपासून उद्भवलेल्या आहेत. असे मानले जात असल्यामुळे या भाषाकुलाला इंडो-युरोपियन भाषाकुल असे म्हटले जाते. भाषाभ्यासात इंडो-युरोपियन भाषाकुलाचीच कल्पना सर्वप्रथम मांडली गेली. या कुलातील भाषांचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप निश्चित झाले. आणि याच पद्धती वापरून जगातील अन्य भाषांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला.

Teacher's Signature

## संदर्भग्रंथ सूची


1. Hoenigswald H.m. The principle step in comparative Grammar. Language 260-357.
2. कानडे मु.श्री (संपादक). मराठीचा भाषिक अभ्यास. भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा १-३० पृ ९४, १९७९.
3. कुलकर्णी कृ.पा मराठी भाषा : उद्गम आणि विकास
4. जोशी रा.भि. मराठी भाषेची घटना १९२३
5. मेहेंदळे म.अ. भाषाकुलाची संकल्पना आणि मराठी भाषा, मराठीचा भाषिक अभ्यास (संपा - कानडे मु.श्री). १९७९.
6. वैद्य चि.वि आणि गुणे पां.द. मराठी भाषेची उत्पत्ती १९९८.


Parkhale